Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# मॅनेजमेंट माणसांची

24 Jun 2011, 0354 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

एखादा उद्योग-व्यवसाय सुरू करायचा, कोणत्याही वस्तूचे उत्पादन करायचे किंवा सामाजिक उद्देशाने संस्था चालवायची तर या सगळयासाठी आवश्यक असते ते मनुष्यबळ. त्यामुळे आधुनिक व्यवस्थापनात मनुष्य संपदा व्यवस्थापन- ह्युमन रिसोसेर्स मॅनेजमेंट हा स्वतंत्र विभागच असतो.

समर्थ रामदासांचे कार्य आणि लेखन पाहिल्यावर १६व्या शतकात त्यांनी मानवी संपदा व्यवस्थापनाशी संबंधित अनेक पैलूंवर केलेले भाष्य आजच्या काळातील आधुनिक सिद्धांतांशी मिळते जुळते असल्याचे जाणवते. आपल्या कार्यसिद्धीसाठी उत्तमोत्तम माणसे कशी मिळवावीत हे सांगताना समर्थ म्हणतात, काही येक परीक्षावे। शोधावे बहुतांपरी। नेटके कार्य साधावे। रोधावे कुटीळा जना।।

म्हणजे बऱ्याच लोकांमधून ठराविक जणांना पारखून घ्यावे आणि असे लोक निवडताना संस्थेच्या हिताला घातक ठरणाऱ्या कुटीलांना वगळावे असे समर्थ सांगतात. दुसऱ्या एका ओवीत याच मुद्यावर भर देताना समर्थ सांगतात की उत्तम व्यवस्थापक हा नेहमी संस्थेची गरज लक्षात घेऊन ती पूर्ण करण्याची क्षमता असलेली उत्तमोत्तम माणसे निवडतो. स्वत: समर्थ रामदास संन्यासी म्हणून वावरताना, भिक्षा मागण्याच्या हेतूने फिरताना तीक्ष्ण बुद्धीचे तरुण हुडकत आणि त्यांना स्वराज्याच्या कामासाठी प्रेरित करीत.

मनुष्याच्या स्वभावाची वर्गवारी ढोबळपणे तीन प्रकारांत करता येते असे समर्थ सांगतात १) दुसऱ्याची पर्वा न करणारा स्वाथीर्, आत्मकेंदित माणूस २) स्वभावत: दुष्ट, दुसऱ्याचे वाईट चिंतीणारा माणूस, ३) सत्शिल वृत्तीचा, इतरांना सदैव मदत करणारा माणूस. समर्थांचे हे वगीर्करण प्रत्येक मानवी संपदा व्यवस्थापकाला उपयोगी पडणारे आहे. समोरच्या मनुष्याचा स्वभाव जाणून घेतल्यावर त्याचा संस्थेला-कंपनीला किती आणि कसा उपयोग होईल याचा अंदाज बांधून त्याप्रमाणे त्या माणसाला कोणत्या स्थानी नेमायचे हे ठरवता येते.

आता चार माणसे म्हटली की त्यांचे चार स्वभाव आले, चार वेगवेगळे उद्देश आले, पण या वेगवेगळया कदाचित परस्पर भिन्न स्वभावाच्या लोकांना एकत्र करून त्यांच्याकडून संस्थेचे लक्ष्य साधणे हे तर मानवी संपदा व्यवस्थापकाचे काम असते. अशी कामगिरी पार पाडण्याची वेळ माझ्यावर आली तेव्हा समर्थांच्या नीतीचा मला उपयोग झाला. पुणे जिल्ह्यात आळंदीजवळ फुलगाव नावाचे छोटे गाव आहे. त्या गावात १८५३ साली हरी उद्धव धोत्रे या गृहस्थाने मुला-मुलींना मोफत शिक्षण देणारी शाळा सुरू केली. त्यांच्या कुटुंबीयांनी तितक्याच ध्येयनिष्ठपणे ती शाळा पुढे सुरू ठेवली, पण १०० वषेर् होऊन गेली तरी या शाळेला सरकारची मान्यता नव्हती, स्वत:ची इमारत नव्हती. माझे मामा प्रभाकर कुलकणीर् शेतीच्या निमित्ताने फुलगावात स्थाईक झाले होते. त्यांनी मला या शाळेच्या मान्यतेसाठी प्रयत्न करायला सुचविले. सविस्तर माहिती घेतल्यावर माझ्या लक्षात आले की इथे तीन-चार प्रकारची माणसे गुंतलेली आहेत. धोत्रे परिवाराला शाळा पुढे सुरू ठेवायची होती, माझ्या मामांसारख्या काहीजणांना सरकारी परवानगी मिळवणे महत्त्वाचे वाटत होते, गावकऱ्यांना शाळा मोठी व्हायला हवी होती आणि गावातील काहीजणांना शाळेवर आपली सत्ता प्रस्थापित करायची होती त्यामुळे ती मंडळी शाळेला परवानगी मिळू नये म्हणून प्रयत्न करीत होते. अशा विविध वृत्तीच्या लोकांना एकत्र करून शाळेला परवानगी मिळवताना सर्वत्र राखणे राजी। सुखदु:ख जाणोनिया हा समर्थ विचार मला उपयोगी पडला.

आपल्या देशात वेगवेगळ्या क्षमतेचे मनुष्यबळ भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे, त्याचा योजकतेने वापर करून घेण्यासाठी समर्थांच्या मानवी संपदा व्यवस्थापन नीतीचा उपयोग नक्कीच होऊ शकेल.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768